"स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड संलग्नीत वरिष्ठ महाविद्यालयातील अध्यापकांच्या लेखनकार्यात महाविद्यालयी-ा व्रंथालयांचे योगदान : एक अभ्यास"

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या आंतरविद्याशाखे अंतर्गत ग्रंथालयशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी) पदवीसाठी सादर करावयाचा शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधज

श्री. जोगदंडकर गंगाधर महादेव

M.A., M.Lib. & I.Sc., M.Phil.

मार्जदर्शज

प्रा.डॉ. रामेश्वर पवार

M.Com., M.Lib. & I.Sc., M.Phil., Ph.D.

संशोधन मार्गदर्शक तथा ग्रंथपाल,

श्री जुरूबुद्धी स्वामी महाविद्यालय, पुर्जा

ता. पुर्णा, जि. परभणी.

एप्रिल २०१९

प्रस्तावना :

ग्रंथालय संकल्पनेचा उगम झाला आणि मानवाच्या मुलभुत गरजाबरोबर माजसाला ज्ञान मिळविण्यासाठी ग्रंथालयाची गरज भासू लागली. मानसाला ज्ञा-न मिळवण्याच्या जरजेबरोबरच ग्रंथालयाचा उगम झाला. आज २१ व्या शतकास माहिती व तंत्रज्ञानाचे युग म्हणून ओळखले जात आहे. माहिती युगामध्ये ग्रंथालयाचे प्रज ार खालीलप्रमाणे दिसतात. सार्वजनिक ग्रंथालय, शैक्षणिक ग्रंथालय, विशेष ग्रंथालय किंवा माहिती केंद्र यापैकी वैज्ञानिक ग्रंथालयाचा भाग म्हणुन महाविद्यालयाच्या ग्रंथालयाकडे पाहिले जाते. समाज उन्नतीसाठी शैक्षणिक संस्था कार्य करतात. या संस्थांनी स्थापलेली महाविद्यालयाचे ध्येय व उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी महाविद्यालय ग्रंथालयाचे महत्वपूर्ण योगदान आहे.

महाविद्यालय ग्रंथालय हे महाविद्यालयापुरते मर्यादित असतात पण समाजावर परिणामकारक बदल घडविण्यात प्रवृत्त करतात. माहिती तंत्रज्ञान युगात वैज्ञानिज साहित्य कृतीबरोबरच ग्रंथालयाकडे वाचनाचा ओढा वाढत आहे. प्रगतीच्या पाऊलखुणाचा मागोवा घेण्यासाठी ग्रंथालयाचा वापर अपरिहार्य ठरतो आहे. सुसज्ज ग्रंथालय हे महाविद्यालयाचे ज्ञान अलंकार आहे. महाविद्यालयीन प्राध्यापक व विद्यार्थी यांना काळाबरोबर निर्माण होणारी नविन अद्ययावत माहिती व ज्ञान मिळविण्याचे केंद्रबिंदूचे ठिकाण म्हणून महाविद्यालय ग्रंथालयाकडे पाहीले जाते.

आज माहिती तंत्रज्ञानामध्ये प्रचंड प्रगती झाली आहे. यामध्ये महाविद्यालय ग्रंथालय यात मागे नाही. ग्रंथालय व्यवस्थापनात सुसुत्रता आणण्यासाठी काही स्थित्यंतर घडले आहेत. माहिती व तांत्रिक गरजा वाढू लागल्या. या गरजा भागविण्यासाठी ग्रंथालयाच्या स्वरूपात बदल होत गेले आहेत. ग्रंथालय संगणकीकरण, डिजीटल लायब्ररी, व्हर्चिव्हल लायब्ररी असे ग्रंथालयाचे बदलते स्वरूप हे माहिती व तंत्रज्ञान विकासामध्ये शक्य झाले आहे. आपण म्हणतो की, त्या विषयाचा विकास संशोधनावर अवलंबून आहे. विषयाच्या विकासाबरोबर समाजात सुधारणा घडवण्यासाठी संशोधनाचा उपयोग होतो. महाविद्यालय ग्रंथालय २१ व्या शतकामध्ये वाचकांच्या गरजा सक्षमपणे पुर्ण करण्याचा प्रयत्न करत आहेत. महाविद्यालय ग्रंथालयात नविन अद्ययावत

माहिती संग्रह ज़रजे व मातृ संस्थेची ध्येय व उद्दिष्ट पुर्ण करण्यासाठी प्रयत्न करणे तसेच ताजी व उपयुक्त माहिती प्रगतीचा पाया असतो. आधुनिक काळात अशा माहितीला अत्यंत महत्व आहे. अशी अद्ययावत व उपयुक्त माहिती महाविद्यालय ग्रंथालय अध्यापकांच्या लेखनकार्यात उत्तम प्रकारची त्यातील दोष, कमतरता दुर करण्यासाठी त्यांचे चिकित्सकपणे अवलोकन करणे आवश्यक आहे.

संशोधनाबरोबर लेखनाची जोड आवश्यक, स्वातंत्र्यापुर्वी कालखंडात पहातो की, समाज जागृतीचे माध्यम हे लेखकच होते. लेखणीला धार देण्याचे कार्य महाविद्यालय ग्रंथालय करत आहे. ग्रंथालयाचा उगम ते आजपर्यंतच्या इतिहास पाहिला तर असे लक्षात येते की, लेखन व संशोधनामुळे वाचकांचे मनोरंजन, तसेच त्यांचा व्यक्तीमत्व विकास आणि नवनवीन शोध लावले जातात. हे या लेखनाद्वारे घेतलेल्या माहितीच्या आधारे त्या समस्या जाणून घेऊन त्यावर उपाययोजना करण्याचे कार्य हे लेखनामुळे शक्य झाले आहे. लेखन कार्यात वाढ होण्यासाठी ग्रंथालयाचे योगदान नाकारता येत नाही.

आज माहिती तंत्रज्ञान युगामध्ये लेखनकार्य व संशोधन कार्यात महाविद्यालय ग्रंथालय किती सक्षमपणे सेवा सुविधा देत आहेत व त्या सेवा सुविधा बाबतच्या समस्या जाणुन घेणे त्याचबरोबर लेखन कार्य करणा-या व्यक्ती माहिती करून घेण्यासाठी "स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड संलग्नीत महाविद्यालयातील अध्यापकांच्या लेखन कार्यात वरिष्ठ महाविद्यालयीन ग्रंथालयाचे योगदान; एक अभ्यास" हा संशोध-ाचा विषय निवडला आहे.

समस्या विधा-ा :

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड संलग्नित महाविद्यालयीन ज्रंथालया-ने अध्यापकांच्या लेखन कार्यात महत्वपुर्ण भुमिका बजावलेली आहे.

संशोधनाचे स्पष्टीकरण (विषय शिर्षज) :

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने "स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड संलग्नीत वरिष्ठ महाविद्यालयातील अध्यापकांच्या लेखनकार्यात महाविद्यालयीन ग्रंथालयाचे योगदान : एक अभ्यास" असा विषय निवडला आहे.

संशोध-न विषयासंदर्भात स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे -

भौगोलिक माहिती :

महाराष्ट्र राज्यातील मराठवाडा प्रादेशिक विभागातील नांदेड येथे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड हे मराठवाड्यातील दुस-या क्रमांकाचे अकृषी विद्यापीठ आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाची विभागणी होवून मराठवाड्यातील नांदेड, लातूर, हिंगोली, परभणी या चार जिल्ह्यातील वरिष्ठ महाविद्यालयासाठी दि. १७ सप्टेंबर १९९४ रोजी नांदेड येथे मराठवाडा मुक्ती संग्रामाचे थोर स्वातंत्र्य सेनानी प.पू. स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नावाने करण्यात आली व या चार जिल्ह्यात नांदेड-१५ तालुके, लातूर १०, परभणी ०९, हिंगोली ०५ असे एकूण ३९ तालुक्यांचा समावेश होतो.

या चार जिल्ह्यात विशेष धार्मिक स्थळ आहेत. नांदेड शहरात गुरुद्वारा आहे. जिल्ह्यातील माहूर येथे रेणुका मातेचे शक्तिपीठ मंदिर आहे, हिंगोली जिल्ह्यात औंढा नागनाथ येथे नागनाथाचे बारा ज्योतिर्लिंगापैकी एक ज्योतिर्लिंग आहे. परभजी येथे वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ आहे. लातूर जिल्ह्यात वडवळ ना. येथे संजीवनी वन औषधी बेट आहे. खरोसा येथे लेण्या व उदगीर येथे किल्ला आहे. तालुका चाकूर येथे श्री कृष्ण सत्यसाई मंदिर शिवालय आहे, वॉटर पार्क, गार्डन असून तेथे मराठवाड्यातील अनेक शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सहली येतात.

अ) व्याज्या : (Definitions)

"teacher", means full-time approved professor, associate professor assistant professor, reader, lecturer, librarian,[principal, Deputy or Assistant Liberian and Documentation Officer in the university and college Liberian] 3 Director or Instructor of physical education in any university department, conducted, affiliated or autonomous college, autonomous institution or department or recognized institution in the university;

"अध्यापक" म्हणजे विद्यापीठाच्या कोणत्याही संचलित संलग्न किंवा स्वायत्त महाविद्यालयातील, स्वायत्त परिसंस्थेतील किंवा विभागातील किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेतील पूर्णकालीक मान्यताप्राप्त प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापक, प्रपाठक, अधिव्याख्याता, ग्रंथपाल,[2] (प्राचार्य, उप किंवा सहाय्यक ग्रंथपाल व विद्यापीठातील दस्तऐवज अधिकारी व महाविद्यालयाचा ग्रंथपाल) संचालक किंवा शारीरिक शिक्षण निदर्शक.

लेज-ाज ार्य :

एखाद्या समस्यासंबंधी किंवा एखाद्या परिस्थितीसंबंधी वस्तुनिष्ठ लेखन केले जाते तसेच एखादा विशिष्ट हेतू डोळ्यासमोर ठेवुन माहितीचे संकलन केले जाते त्यास लेखनकार्य म्हणतात.

College ''In generally a College is regarded as an institution of higher learning which usually offers there years and four years courses, lending to master degrees use only research takes place of University.

ग्रंथालय :

ग्रंथालयाची व्याख्या

ज्या ठिकाणी ग्रंथाचा संग्रह करुन त्याची तर्ज संगत पद्धतीने मांडणी केली जाते. या सर्व संग्रहाची व्यवस्था व संघटन केले जाते व या संग्रहाचा जास्तीत जास्त उपयोग करावा म्हणुन प्रयत्न केला जातो. अशा ठिकाणाला ग्रंथालय असे म्हणतात.

महाविद्यालय ग्रंथालय :

महाविद्यालयातील विद्यार्थी आणि अध्यापक यांना ग्रंथालय सेवा देण्यासाठी महाविद्यालयाने चालविलेले ग्रंथालय म्हणजे महाविद्यालय ग्रंथालय होय.

ब) व्याप्ती व मर्यादा :

१) भौगोलिक व्याप्ती :

प्रस्तुत संशोधन प्रकल्पाची भौगोलिक दृष्टीकोनातून व्याप्ती स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड संलग्नीत अनुदानित वरिष्ठ कला, वाणिज्य व विज्ञा-ा महाविद्यालये.

२) ज ालमर्यादा :

शैजजिज वर्ष २००९-१० ते शैक्षणिक वर्ष २०१८-१९ (जून ते मे) या कालखंडातील परंतु सेवापटलावर असलेले अध्यापक यांच्यापुरतेच मर्यादित.

३) नमुना निवड :

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड संलग्नीत वरिष्ठ महाविद्यालयातील प्रत्येक विद्याशाखेतील आणि विषयातील अध्यापक नमुना निवड पद्धतीने निवडले जातील.

ज) जरज व औचित्य:

महाविद्यालयीन ग्रंथालय आणि त्याद्वारे दिल्या जाणा-या सेवा यांच्या स्वरूपावर संशोधकाचे समाधान अवलंबून असते. त्यासाठी अध्यापकांच्या माहिती विषयक गरजांचा शोध घेतल्याशिवाय माहिती साधनाची उपलब्धता व माहिती सेवांचे नियोजन करता येत -ाही. अध्यापकांना ग्रंथालयाद्वारे दिल्या जाणा-या सेवा सुविधांच्या संदर्भातही त्यांचे महत्व जाणुन घेणे आवश्यक आहे.

ग्रंथालय सेवा सुविधांचे अध्यापकांच्या गरजांच्या संदर्भात केलेले हे मुल्यमापन अध्यापकांच्या गरजांचे स्वरूप जाणुन घेऊन त्याअनुषंगाने महाविद्यालयीन ग्रंथालयांच्या सेवा सुविधांचे उपयोजन करण्यात उपयुक्त राहील व महाविद्यालयीन ग्रंथालय व्यवस्थापनात ग्रंथपालास वाचकांच्या गरजा जाणून घेज्याच्या दृष्टीने मार्गदर्शक ठरेल. तसेच पुढील काळात संशोधन करणा-या संशोधकांना त्याचा उपयोग होईल.

ड) ध्येय व उद्दिष्टे :

१) ध्येय : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड संलग्नित महाविद्यालयातील अध्यापकांच्या लेखनकार्यात ग्रंथालयाचे महत्वपूर्ण योगदान असते.

२) उद्दिष्टे :

प्रस्तुत संशोधनासाठी पुढील उद्दिष्टांआधारे संशोधन केले जाणार आहे.

१) स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड संलग्नित वरिष्ठ महाविद्यालयातील लेखनकार्य करणा-या अध्यापकांची माहिती घेणे.

२) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड संलग्नित वरिष्ठ महाविद्यालयातील अध्यापकांचे विविध लेज-ाज ार्य जाणून घेणे.

३) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड संलग्नित वरिष्ठ महाविद्यालयातील अध्यापकांच्या लेखन कार्य संदर्भात इतर सहकारी अध्यापक, इतर ग्रंथालय आणि स्वत: खरेदी केलेल्या ग्रंथांचा परामर्श घेणे.

४) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड संलग्नित वरिष्ठ महाविद्यालयातील अध्यापकांच्या विविध लेखन ज ार्यातील श्रेजीनिहाय (रॅंज लिस्ट) यादी तयार करणे.

५) स्वामी रामा-ंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड संलग्नित वरिष्ठ महाविद्यालयातील अध्यापकांच्या विविध अधिवेशने, कार्यशाळा, चर्चासत्र, संशोधन कार्य संदर्भात लेखन कार्यातील ग्रंथालयांच्या योगदानाचा परामर्श घेणे.

६) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड संलग्नित वरिष्ठ महाविद्यालयातील अध्यापकांच्या लेखनकार्यातील ग्रंथालयाच्या योगदानाची परिणामकारकता तपासणे.

इ) प्राथमिक अनुमान- संशोधनाची ज़ृहीतके :

सामाजिक संशोधनामध्ये नेहमीच समस्या विधान अथवा अनुमान मांडता येत नाही. निदान विषय नाम संशोधन दर्शक असावे लागते. शास्त्रीय संशोधनामध्ये गृहीतकृत्यांना विशेष महत्त्व असते. म्हजूनच ग्रंथालयाच्या विकासाचा अभ्यास करताना काही गृहीतके मांडावी लागतात.

१) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड संलग्नित वरिष्ठ महाविद्यालयातील अध्यापक लेखनकार्य करतात.

२) स्वामी रामा-ंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड संलग्नित वरिष्ठ महाविद्यालयातील अध्यापकांचे विविध प्रकारचे लेखन कार्य आहे.

३) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड संलग्नित वरिष्ठ महाविद्यालयातील अध्यापकांच्या लेखन कार्य संदर्भात त्यांचे सहकारी अध्यापक, इतर ग्रंथालये आणि स्वत: खरेदी केलेल्या साहित्यांचे योगदान आहे.

४) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड संलग्नित वरिष्ठ महाविद्यालयातील अध्यापकांच्या विविध लेखन कार्यांची श्रेणी निहाय (रँक लिस्ट) यादी तयार करता येते.

५) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड संलग्नित वरिष्ठ महाविद्यालयातील अध्यापकांच्या विविध अधिवेशने, कार्यशाळा, चर्चासत्र, संशोधन कार्य संदर्भात लेखन कार्यात ग्रंथालयांचे महत्वपूर्ण योगदान आहे.

६) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड संलग्नित वरिष्ठ महाविद्यालयातील अध्यापकांच्या विविध लेखन कार्यातील ग्रंथालयांच्या योगदानाची परिणामकारकता आहे.

माहिती जोळा करण्याचे लक्ष गट :

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड संलग्नित वरिष्ठ ज्ला, वाणिज्य व विज्ञा-ा महाविद्यालय.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे.

माहिती संकलन तंत्र :

माहिती संकलन तंत्र म्हणून पहाणीचे तंत्र वापरले जाणार आहे.

माहिती संकलन साधने :

सदरील संशोधनांसाठी अध्यापज प्रश्नावली आणि ग्रंथपाल मुलाखत अनुसुची ही माहिती संकलनाची साधने असतील.

प्रकरणाचा आराखडा

प्रज रज पहिले : संशोध-ा प्रज ल्प : विषय प्रवेश

१.१ प्रस्तावना

१.२ संशोधनाचे स्पष्टीकरण

१.३ व्याप्ती व मर्यादा

१.४ संशोध-ाची गरज व औचित्य

१.५ संशोधनाचे ध्येय व उद्दिष्टे

१.६ प्राथमिक अनुमान (गृहीतके)

१.७ संशोधन पद्धती

१.८ माहिती संकलन तंत्र

१.९ माहिती संकलन साधने

१.१० -ामु-ा सर्व्हेजज

१.११ पुढील प्रकरणांचा संक्षिप्त आढावा.

प्रज रज दुसरे : विषयाचा जागतिक पातळी पासून ते स्थानिक पातळीपर्यंत संक्षिप्त आढावा व पुर्वाभ्यासाचे समालोचन.

प्रकरण तिसरे : माहिती संकलन

प्रकरण चौथे : माहिती विश्लेषण

प्रकरण पाचवे : समाप-ा

५.१ -िष्ज र्ष

५.२ शिफारशी

५.३ पुढील संशोधनास दिशा

संदर्भसूची

परिशिष्टे

१) प्रश्-ावली -ामु-ा

२) मुलाखत अनुसूची नमुना

३) छायाचित्रे

संदर्भ सुची

१) पाटील, श्रीराम, २००२, मायबोलीचा मराठवाडा, औरंगाबाद. योगेश प्रकाशन पृ.क्र १५-१६.

२) ढवळे, केशव भिकाजी, २००२, मॉडर्न डिक्शनरी, मुंबई, कर्नाटक मुद्रणालय, पृ.क्र.५२७.

३) शिर्के, कुमारी शारदा, १९९९, ग्रंथालय प्रशासन, पुणे, अंजली प्रकाशन, पृ.क्र.७.

४) कुंभार, राजेंद्र २००६ महाविद्यालयीन व विद्यापीठीय ग्रंथालय, नाशिक, ग्रंथ निर्मिती केंद्र, य.च.म.मु.विद्यापीठ.नाशिक, पृ.क्र.२.

५) माडिवाले, द.व. १९८८ महाविद्यालयीन ग्रंथालय व्यवस्थापन पुणे.दास्ताने रामचंद्र आणि क.पृ.क्र.०६-७.

६) नरगुंदे, रेवती, २००६ ग्रंथालय आणि सामाजिक विकासत महाविद्यालयीन ग्रंथालयांची भूमिका पुणे युनिव्हर्सल प्रकाशन, पृ.क्र.१२०, १२५.

७) कुंभार, राजेंद्र, २००६ महाविद्यालयीन ग्रंथालये, नाशिक, ग्रंथ निर्मिती केंद्र, य.च.म.मु.विद्यापीठ, नाशिक, पृ.क्र.२,३,४.

८) निकोशे, सत्यप्रकाश, २००७, ग्रंथालय व माहितीशास्त्र संशोधन पध्दती, नागपूर. प्रज्ञा प्रकाशन, पृ.क्र.५५.

९) आगलावे, प्रदिप, २००८, सामाजिक संशोधन पध्दती शास्त्र व तंत्रे, नागपूर, श्री. साईनाथ प्रकाशन, पृ.क्र.१७.

१०) रिसवाडकर, म.रा.२००४, संशोधन: व्याख्या आणि पध्दती, नाशिक, निर्मिती केंद्र, य.च.म.मु.विद्यापीठ, नाशिक, पृ.क्र.१.

११) भांडारकर पु.ल. १९९९, सामाजिक संशोधन पध्दती, औरंगाबाद. महाराष्ट्र विद्यापीठ, ग्रंथनिर्मिती मंडळ, विद्याबुक्स, पृ.क्र.१०.

१२) रिसवाडकर, म.रा.२००४, संशोधन: व्याख्या आणि पध्दती, नाशिक, निर्मिती केंद्र, य.च.म.मु.विद्यापीठ, नाशिक, पृ.क्र.१७.

१३) जैरनार, दिलीप, २००४, सामाजिक संशोधन पध्दती, औरंगाबाद. चिंन्मय प्रजाशन, पृ.ज्र. १३३-१४२.

१४) पाटील, या.भा. १९९८, संशोधन पध्दती, नागपूर, श्री.मंगेश प्रकाशन, पृ.क्र.८७ व पृ.ज्र.१२१.

१५) पाटील या.भा. १९९८, संशोधन पध्दती, नागपूर, श्री. मंगेश प्रकाशन, पृ.क्र. १२२-१२४.

16) Kumar, Krishna,1996, Library Organization, Delhi, New Delhi, Public P.No.51.

17) Vyas S.D. 1994, Academic Library system, Jaipur, Panchsheel Prakashan, P.No.59 & 61.

18) Maharashtra University Act, 1994: 22nd July 1994 Government notification, Higher and Technical Education and Employment Department, No. USG, 1492/104201/(13L92) UNI-3.

19) महाराष्ट्र विद्यापीठ कायदा 1994, मराठी भाषांतर / 196 1/2, Added by the university Amendment Act of 26th Dec. 2000.

संशोधज

श्री. जोगदंडकर गंगाधर महादेव

M.A., M.Lib. & I.Sc., M.Phil.

मार्जदर्शज

प्रा.डॉ. रामेश्वर पवार

M.Com., M.Lib. & I.Sc., M.Phil., Ph.D.

संशोधन मार्गदर्शक तथा ग्रंथपाल,

श्री जुरूबुद्धी स्वामी महाविद्यालय, पुर्जा

ता. पुर्णा, जि. परभणी.